<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १७०/१९८१ मधील निशाणी ३२५ खालील आदेश.</u>

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १३ इब्राहीम महिबुब खान यांचे वारसांना रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होण्यासाठी दाखल केला आहे.

**प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

२. प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. १३ इब्राहीम महिबुब खान हे दिनांक ०९/०२/२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादीने मुदतीत त्यांचे वारस रेकॉर्डवर घेतलेले नाहीत. वादीने प्रतिवादी क्र. ४ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास मुद्दामहुन विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्र. १३ चा मृत्युउतारा व आवश्यक माहीती वेळेत न मिळाल्याने प्रतिवादी क्र. १३ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला आहे. विलंब माफ केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट विलंब माफ न केल्यास वादीचे नुकसान होईल. त्यामुळे वादीतर्फे प्रतिवादी क्र. १३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळावा अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचा दावा मिळकतीचे वाटप होवुन वादीचे ९/४० हिश्याचा स्वतंत्र व वेगळा मालकी हक्काचा कब्जा प्रतिवादी यांचेकडून देववावा व मागणीप्रमाणे दाव्यापुर्वीची भाडेबाकी जबाबदार प्रतिवादीकडून देववावी या व इतर कारणासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादीने स्वतःचे शपथपत्र दाखल केलेले आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोणातुन

दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. १३ यांचे वारस यांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. त्यामुळे वाद मुद्यांचे निराकरण गुणवत्तेवर होणार आहे. मात्र तसे न केल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे प्रतिवादी क्र. १३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ न केल्यास न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायोचीत वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रुपये २००/– चे खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना प्रतिवादी क्र. १३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

ATUL BHIMRAO PATIL

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2023.08.01 17:35:09 +0530

कोरेगाव.
दि. २८/०७/२०२३

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.